# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या १२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.१९ मार्च, २०१६ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची १२ वी बैठक दि.१९ मार्च, २०१६ रोजी दुपारी १२:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३) | डॉ. नंदनवार डी. आर., प्रभारी सहसंचालक, मा. संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी,पुणे | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | श्री. मते एच. बी., संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ | सदस्य |
| ६) | प्रा. सूर्यवंशी एस. एस., प्र. ग्रंथपाल | सदस्य |
| ७) | मा. श्री. गणपतराव देशमुख, विधानसभा सदस्य | सदस्य |
| ८) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

मा. आमदार श्री. गणपतराव देशमुख यांचे महाराष्ट्र विधानसभेने सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेवर नामनिर्देशन केल्यानंतर त्यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती :**

मा. संचालक, (D. M. E. R.) मुंबई व मा. ॲड. दिलीप सोपल, विधानसभा सदस्य अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा.कुलगुरुंना अकराव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

**"अ" जनरल आणि कुलसचिव कार्यालय:**

१. उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संदर्भात मुंबई येथे दिनांक ०३ नोंव्हेबर, २०१५ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेस मा. कुलगुरु महोदय उपस्थित होते.

२. ड्रीम ॲकॅडमी सोलापूर यांचे विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ५९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दिनांक ०५ डिसेंबर, २०१५ रोजी आयोजित केलेल्या अखंड १८ तास अभ्यास अभिवादन उपक्रम कार्यक्रमास मा. कुलगुरु प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

३. प्री ट्रेनिंग आय.ए.एस. कोचिंग कर्न्सन फॉर पिपल चॅरिटेबल ट्रस्ट यांचे विद्यमाने दिनांक १२ डिसेंबर, २०१५ रोजी आयोजित केलेल्या भारतीय प्रशासन सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम सोहळ्यास मा. कुलगुरु महोदय प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.

४. सोलापूर विद्यापीठाचे नॅक, बेंगलोर द्वारा दिनांक ०९ सप्टेंबर, २०१५ ते दिनांक १२ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत प्रथम मुल्यांकन होऊन विद्यापीठास “ब” (CGPA- २.६२) मानांकन प्राप्त झाल्याचे नॅक बेंगलोरचे प्रा. धीरेंद्रपाल सिंग, संचालक यांनी जा. क्र. F. १९.२६/ES(SC-१०)DO/२०१५/७.१ दिनांक १६/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

५. २६ जानेवारी, २०१६ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यापीठाच्या प्रांगणात मा. कुलगुरु महोदय यांच्या शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

६. राज्य शासनाच्या दिनांक १९ जून, २०१४ च्या शासन निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठात अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली असून या समितीच्या ध्येय धारणानुसार दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी विद्यापीठ सभागृहात श्रीमती शिवकन्या कदेरकर यांचे “आधुनिक काळातील महिला सबलीकरण” या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

७. अहवाल कालावधीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता विद्यापीठातील विविध संकुल/अधिविभागाकडे प्रवेशीत एकूण ८९० विद्यार्थ्यांपैकी मागासवर्गीय ४०३ विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने मा. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, सोलापूर यांचेकडे सादर करण्यात आले.

८. प्रस्तुत विद्यपीठातील संकुलाकडे रिक्त असलेल्या शिक्षक पदांच्या मुलाखतीचे आयोजन दिनांक ०६/०१/२०१६ आणि ०७/०१/२०१६ रोजी करण्यात आले.

९. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्रं. उशिसं/एमआयएस/२०१५-१६/सांख्यिकी/८१५८ दि. १२/०८/२०१५ नुसार (अभियांत्रिकी विद्याशाखा वगळून) सर्व संलग्नित महाविद्यालयांना माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS) या पोर्टलवर सन २०१५-१६ या वर्षाची माहिती नोंदणे बाबत दिनांक २५/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये

कळविण्यात आले. सदर माहिती ऑनलाईन भरताना महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विद्यापीठामार्फत दिनांक ०८/१०/२०१५ रोजी दु. २:०० ते सायं. ५:०० पर्यंत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

तदनंतर महाविद्यालयांच्या त्रुटी दुरध्वनीद्वारे तसेच प्रत्यक्ष बोलावून दूर करुन माहिती ऑनलाईन भरण्यात आली. सलग तिसऱ्यांदा सोलापूर विद्यापीठ माहिती व्यवस्थापकी प्रणाली (MIS) मध्ये माहिती भरण्यात प्रथम क्रमांकावर आहे

**"ब" महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ:**

१. शिक्षक मान्यता विभागांतर्गत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या तीन अर्जावर कार्यवाही करुन संबंधितांना माहिती देण्यात आली असून एक अपिल अर्जावर कार्यवाही करण्यात आली.

२. डी. ए. व्ही. वेलनणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर आणि ए. आर. बुर्ला वरिष्ठ महिला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील दोन शिक्षकांना पदोन्नती निवड समितीने गुणवत्तेवर अधारीत सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोग प्राध्यापक संवर्गातून दिलेल्या पदोन्नतीच्या शिफारशीस मान्यता देण्यात आली.

३. लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी कॉलेज, वडाळा, ता. उ. सोलापूर येथे विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव दिनांक ३० व ३१ डिसेंबर, २०१५ रोजी संपन्न झाला. या महोत्सवामध्ये ५०० विद्यार्थ्यांनी २५४ इतके प्रकल्प सादर केले. या महोत्सवामधून निवडलेल्या ४५ संशोधकांचा संघ राज्यस्तरीय अविष्कारासाठी पुणे विद्यापीठ येथे व ८ जणांचा संघ विभागीयस्तरीय अन्वयेषण महोत्सवासाठी राजस्थान बिकानेर येथे पाठविण्यात आले.

४. संलग्नता विभागातंर्गत शैक्षणिक व प्रशासकीय मुल्यमापन करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून या बाबत सर्व अनुदानित (४०) महाविद्यालयांच्या तपासणी करण्याकरीता समित्या नियुक्त करुन तपासणी अहवाल प्राप्त झाले आहेत.

५. अहवाल कालावधीत विज्ञान व शिक्षणशास्त्र शाखेतंर्गत प्रत्येकी ०१, सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतंर्गत ०३ विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

६. संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील दिनांक ३१/१२/२०१५ अखेरची मागासवर्गीय अनुशेषाची माहिती शासनास पाठविण्यात आली आहे.

**"क" परीक्षा विभाग:**

१. ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१५ या सत्रातील एकूण ५२६ परीक्षापैकी आजपर्यंत एकूण ५०९ परीक्षांचे निकाल विहीत वेळेत जाहीर करण्यात परीक्षा विभाग यशस्वी झाला आहे.

२. या वर्षीच्या दीक्षांत समारंभासाठी स्नातकांकडून दीक्षांत अर्ज ऑनलाईन प्रक्रियेने भरुन घेण्यात आले.

३. परीक्षा मंडळाच्या बैठका दिनांक ०५/१०/२०१५ व दिनांक ११/१२/२०१५ रोजी संपन्न झाल्या.

४. दिनांक १२ डिसेंबर, २०१५ रोजी विद्यापीठ परीक्षा विभागाने Mobile App विद्यार्थ्यांसाठी लोकार्पण केले.

५. दिनांक ०१ जानेवारी, २०१६ रोजी विद्यापीठ परीक्षा विभागाने विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन व विद्यार्थ्यांच्या उपयुक्त माहिती करीता Whats App सुविधा ९१३००१३०९१ या क्रमांकावर कार्यान्वित केलेली आहे. दररोज शेकडो विद्यार्थी या सुविधेचा लाभ घेत आहेत.

६. मार्च २०१६ च्या परीक्षा व शासनाच्या निर्देशानुसार परीक्षा पध्दतीत ICT चा वापर या करीता सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६ जानेवारी, २०१६ रोजी विद्यापिठात आयोजित करण्यात आली.

७. प्रस्तुत विद्यापीठाचा ११ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी अयोजित करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रख्यात अर्थतज्ञ व मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु व राज्यसभा सदस्य मा. प्रा. भालचंद्र मुणगेकर हे उपस्थित होते. या समारंभात विविध विषयात गुणवत्ता प्राप्त केलेल्या एकूण २८ गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाने गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रदान केलेले पदवीप्रमाणपत्र हे Tear Resistant व Water Proof असून डी मॅटिंग केलेले असून सदर प्रमाणपत्रावर २ D Barcode, QR Code, Gold Foil, Embossing हॉलमार्क इत्यादी सुरक्षा चिन्हासह छपाई करण्यात आलेली आहे.

८. प्रस्तुत विद्यापीठात पदवीदान समारंभात खालील नव्याने देणगीदारांच्या देणगीमधून सुवर्णपदके देण्यात आली आहेत. १) स्वर्गीय निशा कारखानीस सुवर्णपदक २) श्री. बी. के. रविगुरुजी सुवर्णपदक ३) श्री. पी. बी. कामतकर व श्री. प्रवणि प. कामतकर सुवर्णपदक ४) दिवगंत प्राचार्य डॉ. मधुकर फरताडे सुवर्णपदक ५) बुध्दवासी आर. एस. रणश्रृंगारे सुवर्णपदक ६) मातोश्री स्वर्गीय वालुबाई शिवलाल शहा व पिताश्री स्वर्गीय शिवलाल रामचंद्र शहा सुवर्णपदक ७) कै. पांडुरंग उर्फ बाबूराव शंकरराव सागरे सुवर्णपदक ८) दलित मित्र चंदा्रम चव्हाण सुवर्णपदक ९) स्वर्गीय उध्दव जयराम माळी स्मृती सुवर्णपदक १०) श्री. निवृत्ती व्होनप्पा गायकवाड (स्वकुळसाळी) सुवर्णपदक.

**"ड" ग्रंथालय, संकुले व चर्चासत्रे:**

१. दिनांक ३१/१२/२०१५ रोजी मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय समितीची ११ वी बैठक संपन्न झाली.

२. भूशास्त्र संकुलात एम.एस्सी. भूशास्त्र विषयांची सीबीसीएस अभ्यासक्रमाची बैठक दिनांक ३०/११/२०१५ रोजी संपन्न झाली. या बैठकीसाठी सदस्य म्हणून शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा. एन. जे. पवार, प्रा. एन. आर. कळमणकर, प्रा. ए. जी. उगरकर, कर्नाटक विद्यापीठ, धारवाड व अध्यक्ष म्हणून प्रा. पी. प्रभाकर उपस्थित होते.

३. भूशास्त्र संकुलाकडील भूशास्त्र, भूमाहितीशास्त्र व पर्यावरणशास्त्र या विषयातील विद्यार्थ्यांची अभ्यास सहल माहे डिसेंबर, २०१५ मध्ये संकुलाकडील तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केल्या होत्या.

४. दिनांक ०४/०२/२०१६ रोजी पदार्थविज्ञान संकुलाच्या दर्शनी भागामध्ये मा. कुलगुरु यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

५. रसायनशास्त्र संकुलाकडे एम.एस्सी. भाग-१ व भाग- २ च्या विद्यार्थ्यांकरीता दिनांक २५/०१/२०१६ रोजी Computational and Quantum Chemistry: The ultimate way to understand and simulate chemical process या विषयावर डॉ. अनंत कुलकर्णी, शास्त्रज्ञ भारतीय विज्ञान संस्था बेंगलोर, कर्नाटक यांचे पाहुणे व्याख्यान आयोजित करण्यात आले सदर व्याख्यानाचा संकुलातील विद्यार्थी/विद्यार्थीनी आणि शिक्षकवृदांने लाभ घेतला.

६. दिनांक १२/०१/२०१६ रोजी स्वामी विवेकानंद यांच्या १५३ व्या जयंती निमित्त भूशास्त्र संकुलात स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावरील लघुपट विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आला.

७. श्री. डी. एन. धोटे सिनियर जिऑलॉजिस्ट जी. एस. डी. अे., सोलापूर यांचे दिनांक ०२/०२/२०१६ रोजी भूशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांच्याकरीता व्याख्यान ठेवण्यात आले. सदर व्याख्यानास संकुलातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

८. दिनांक २८ व २९ जानेवारी, २०१६ रोजी संगणकशास्त्र संकुलामध्ये गणित विभागाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील Use of Latex या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेमध्ये शिक्षक, संशोधक, विद्यार्थी आणि विद्यार्थीनीनी आपला सहभाग नोंदविला.

९. दिनांक ०२/०२/२०१६ रोजी संगणकशास्त्र संकुलातील एम.सी.ए. व कॉम्प्युटर सायन्स या विभागाच्यावतीने Dexter Innofest-२०१६ या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये सोलापूर, पंढरपूर, सांगोला, बार्शी, अकलूज आणि लातूर येथील विविध महाविद्यालयातील संगणकशास्त्र या विषयातील एकूण ३०० पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी प्रोग्रामिंग व पेपर सादरीकरणासाठी आपला सहभाग नोंदविला.

१०. प्रस्तुत विद्यापीठातील इतिहास आणि पुरातत्वशास्त्र विभागाच्या विभागाच्या विभागप्रमुख डॉ. माया पाटील यांना महाराष्ट्र राज्य शासनातर्फे उत्कृष्ट वाङमय निर्मितीसाठी दिला जाणारा स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङमय पुरस्कार (राजर्षी शाहू साहित्य पुरस्कार) २०१६ डॉ. माया पाटील यांच्या “मराठवाड्यातील काही शिल्पे आणि मंदिर स्थापत्य” या पुस्तकासाठी जाहीर झाला.

११. सामाजिक शास्त्रे संकुलातील सहयोगी प्राध्यापक डॉ. गौतम कांबळे यांना Indian Council of Social Science Research, (ICSSR), नवी दिल्ली या संस्थेकडून Economic Analysis of Rural Poverty in Western Maharashtra या विषयासाठी संशोधन प्रकल्प मंजूर करण्यात आला असून या संशोधन प्रकल्पासाठी त्यांना रु. ८ लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

१२. सामाजिकशास्त्रे संकुलातील मास कम्युनिकेशन विभागातर्फे पत्रकार दिनाचे औचित्य साधून दिनांक ०४ जानेवारी, २०१६ रोजी दै. लोकमत सोलापूरचे संपादक श्री. राजा माने यांचे “प्रसार माध्यमातील करिअर संधी” या विषयावर तर दिनांक ०६ जानेवारी, २०१६ रोजी दै. दिव्य मराठी या वृत्तपत्राच्या पत्रकार श्रीमती अश्विनी तळवळकर यांचे “महिला आणि माध्यमे” या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर व्याख्यानास संकुलातील शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

१३. दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी सामाजिक शास्त्रे संकुलामध्ये जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व प्राध्यापक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचे “सोलापूरच्या स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांचे योगदान” याविषयावर व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. सदर व्याख्यानास संकुलातील शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थींनी बहुसंख्येने उपस्थित होते.

**"ई" राष्ट्रीय सेवा योजना:**

१. दिनांक ३१/१०/२०१५ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त सकाळी ८:०० वाजता एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सोलापूर शहरातील विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी व मा. कुलगुरु यांनी सहभाग नोंदविला.

२. दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी सकाळी ८:०० वाजता जागतिक एड्स दिनानिमित्त भव्य जनजागरण दिंडीचे आयोजन सोलापूर शहरामध्ये करण्यात आले होते. त्यामध्ये सोलापूर शहरातील विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी आणि सोलापूर जिल्हा रुग्णालय येथे जागतिक एड्स दिनानिमित्त संपन्न झालेल्या कार्यक्रमास मा. कुलगुरु, मा. जिल्हाधिकारी, मा. जिल्हा शल्य चिकित्सक आणि अधिष्ठाता व्ही. एम. वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर यांचे समवेत सहभाग नोंदविला.

३. १३ डिसेंबर, २०१५ ते आज अखेर "जलव्यवथापनासाठी युवक" या विषयावर आधारीत सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या एकूण १७ महाविद्यालयांचे ०७ दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. तसेच उर्वरीत महाविद्यालयाची शिबीरे जानेवारी, २०१६ अखेरपर्यंत संपन्न झाली.

४. दिनांक १८ ते २२ जानेवारी, २०१६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबीरासाठी प्रस्तुत विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे चार स्वयंसेवक व एक कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले.

५. दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी राज्यसतरीय प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे होणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक संचलन परेड करीता दिनांक १७ ते २६ जानेवारी, २०१६ या १० दिवसाच्या कालावधीत प्रस्तुत विद्यापीठातील दोन स्वयंसेवक सहभागी झाले.

६. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी येथे दिनांक ०५ ते ०७ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत आयोजित उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धेमध्ये प्रस्तुत विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकूण १९ स्वयंसेवकांचा संघ सहभागी झाला असता या स्पर्धेमध्ये विद्यापीठास एकूण ०८ चषकासह ०६ पारितोषिके प्राप्त झाली.

**"फ" क्रीडा व विद्यार्थी कल्याण विभाग:**

१. आंतरविद्यापीठ स्पर्धा स्विमिंग मुली सलग तीन वर्ष जनरल चॅम्पीयनशिप सोलापूर विद्यापीठाकडे कायम राखण्यात यश मिळविले तर मुलांच्या आंतरविद्यापीठ स्विमिंग स्पर्धेत जनरल चॅम्पीयनशिप मिळविले.

२. महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव २०१५-१६ च्या स्पर्धा दिनांक २७/११/२०१५ ते दिनांक ०१/१२/२०१५ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे पार पडल्या. सदर स्पर्धेत मुलांच्या ५ व मुलींच्या ५ संघाने सहभाग नोंदविला व कु. ज्योति बनसोडे या मुलीने मैदानी क्रीडा स्पर्धेतील गोळाफेक या खेळप्रकारात सिल्वर पदक मिळविले.

४. अखिल भारतीय अंतरविद्यापीठ धनुर्विद्या स्पर्धा पंजाबी विद्यापीठ, पतियाला, पंजाब येथे दिनांक २२ ते २६ जानेवारी, २०१६ यादरम्यान पार पडल्या सदर स्पर्धेकरीता प्रस्तुत विद्यापीठातील मुले व मुलींचा संघ सहभागी झाला. रिकर्व या प्रकारात कु. स्वाती नगरकर या खेळाडूने सिल्व्हर व ब्रांझ पदक मिळविले. संघव्यवस्थापक म्हणून प्रा. धनंजय कमलाकर यांनी काम पाहिले.

५. राज्यपाल भवन, मुंबई आयोजित आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे दिनांक २२ ते २६ जानेवारी, २०१६ दरम्यान आयोजित करण्यात आला होता. युवा महोत्सवात प्रस्तुत विद्यापीठाच्या संघास शोभायात्रा या कलाप्रकारात द्वितीय व लघुनाटिका या कलाप्रकारात द्वितीय असे दोन बक्षिसे मिळाली.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.२८ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या अकराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/७६१०, दि.३०/११/२०१५ अन्वये, दि.२८ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या अकराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.१९/१२/२०१५ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२८ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या अकराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

ठराव: **अधिसभेच्या दि.२८ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या अकराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.**

[ २ ] **विद्यापीठाचे सन २०१५-१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१६-१७ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

प्राचार्य आर. वाय. पाटील यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१६-१७ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत केलेली शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात".

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (e) आणि १०१ नुसार विद्यापीठाचे सन २०१५-१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१६-१७ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याकरीता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. ए. ए. शेख | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील | सदस्य |
| ३) | श्री. एस. ए. नारकर | सदस्य |
| ४) | प्र. वित्त व लेखा अधिकारी | सदस्य - सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.१३, १४ व २८ जानेवारी, २०१६ रोजी सर्व विभाग व संकुलप्रमुख यांचेसमवेत बैठक घेऊन व त्यांचेशी चर्चा करुन तयार केलेले सन २०१५-१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१६-१७ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या दि.१६/०२/२०१६ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.०३ नुसार सादर केले असता, त्यावर सर्वकष चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव : | सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०१६-१७ च्या मूळ अंदाजपत्रकास व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.२३/०२/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्र.१० अन्वये विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठाच्या सन २०१५-१६ च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन २०१६-१७ च्या मूळ अंदाजपत्रकास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दुरुस्तीसह स्विकारुन अधिसभेस सर्वानुमते मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचे सन २०१५-१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१६-१७ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव **प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यांनतर त्यास डॉ. एस. एम. देशपांडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील सदस्यांनी त्यांचे विचार मांडले.**

**१) मा. आमदार श्री. गणपतराव देशमुख**

**२) डॉ. एस. एम. देशपांडे**

**त्यानंतर सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रकावर व सन २०१६-१७ च्या मूळ अंदाजपत्रकावर मुद्देसूद चर्चा झाली व सदर प्रस्ताव सूचना व दुरुस्तीसह सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **कुलसचिव** | **मा. कुलगुरु** |
| **सचिव, अधिसभा** | **अध्यक्ष, अधिसभा** |